दैनिक
# रायगड नगरी

अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.९ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## एसटी कर्मचाऱ्यांची 'सिल्व्हर ओक'वर धडक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एसटी महामंडळाचं राज्य शासनात विलीनीकरण करावं, ही एसटी कर्मचाऱ्यांची मागणी राज्य सरकारने अमान्य केल्याने आक्रमक झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांनी आज थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी धडक दिली आहे. यावेळी संपकरी कर्मचाऱ्यांनी शरद पवार यांच्याविरोधात आक्रमक घोषणाबाजी केली. त्यामुळे या परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं.

आक्रमक झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांना पांगवण्यासाठी पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. मात्र कर्मचाऱ्यांनी थेट 'सिल्व्हर ओक'समोर ठिय्या मांडण्याची भूमिका घेतली. त्यामुळे एसटी कर्मचारी आणि पोलीस प्रशासनामध्ये संघर्षही झाला. दरम्यान, भाजपचे विविध नेते आणि वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या चिथावणीमुळेच एसटी कर्मचाऱ्यांनी शरद पवार यांच्याविरोधात आंदोलन केल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादीकडून देण्यात आली आहे.

# सिडकोची घरे ही सर्वसामान्यांसाठी परवडणारी : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सध्याच्या महागाई आणि मंदीच्या काळात सिडकोची परवडणाऱ्या दरातील घरे ही सर्वसामान्य नागरिकांसाठी फायदेशीर ठरणारी आहेत, असे उद्गार एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास यांनी काढले. सिडकोच्या जानेवारी-२०२२ गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीचा प्रारंभ एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला यावेळी त्यांनी दूरस्थ पद्धतीने आपला संदेश व्यक्त केला.

या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, शशिकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, फैयाज खान, महाव्यवस्थापक (गृहनिर्माण), सिडको यांसह सिडकोतील विभाग प्रमुख आणि अधिकारी दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. सिडको साकारत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासोबतच अन्य



अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे नवी मुंबईमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांना घरांमध्ये केलेली गुंतवणूक ही भविष्यात फायदेशीर ठरणार असल्याचे सांगत एकनाथ शिंदे यांनी सोडतीमध्ये घर लाभलेल्या यशस्वी अर्जदारांचे अभिनंदन केले.

डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी प्रास्ताविकामध्ये गृहनिर्माण योजनेची संक्षिप्त माहिती देत सिडको सर्वसामान्यांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे सुरेश कुमार, माजी लोकायुक्त यांच्या पर्यवेक्षणाखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या देखरेख समिती व्यतिरिक्त, अर्जदारांपैकी संतोष पिंपळे, मधुकर पिसाळ आणि राजेश चव्हाण यांनी पंच म्हणून काम पाहिले. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी बोलून दाखवली.

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली सिडकोतर्फे २६ जानेवारी २०२२ रोजी प्रारंभ करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत सुरुवातीस ५,७३० सदनिका तळोजा नोडमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यानंतर अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा म्हणून द्रोणागिरी, घणसोली, कळंबोली, खारघर आणि तळोजा नोडमधील आणखीन काही रिक्त सदनिकांची भर घालून एकूण ६,५०८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या. एकूण ६,५०८ घरांपैकी १,९०५ घरे ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि ४,६०३ सदनिका ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

सिडकोतर्फे गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीसाठी वापरण्यात येणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) ही पुणे स्थित प्रोबेटी सॉफ्ट या नामांकित कंपनीकडून विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली ही पूर्णत: मानवी हस्तक्षेपविरहित आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथील संगणक विभागाकडून या प्रणालीची तपासणी करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे काढण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांमधील निवडक प्रतिनिधींना पंच म्हणून सहभागी करून घेतले जाते. तसेच सोडती दरम्यान पात्र अर्जदारांच्या आणि सदनिकांच्या यादीची यादृच्छिक (Random) पद्धतीने सरमिसळ करण्यात येते. अत्यंत पारदर्शक व निष्पक्ष अशा या प्रक्रियेद्वारे सर्व अर्जदारांना समान संधी सुनिश्चित करण्यात येते. जानेवारी-२०२२ गृहनिर्माण योजनेच्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.



**आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पनवेल निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी डॉ. अनिल पाटील यांचे स्वागत केले. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, रयत शिक्षण संस्थचे विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे उपस्थित होते. (छाया : हरेश साठे)**

## उरण येथील महावितरण कार्यालयात इलेक्ट्रॉनिक मीटरचा तुटवडा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील महावितरण कार्यालयाकडून गेली तीन महिने इलेक्ट्रॉनिक मीटर विद्युत धारक ग्राहकांना पैसे भरून ही मिळत नाही.त्यामुळे उरण शहरातील विशेष करुन ग्रामीण भागातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी या गोष्टीकडे राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे व ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी लक्ष केंद्रित करावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.



उरण येथील महावितरण कार्यालयानी उरण तालुक्यातील ३० ग्रामपंचायत हद्दीतील जीर्ण झालेल्या विद्युत वाहक तारा,लोखंडी पोल बदलावेत अशी मागणी सातत्याने ग्रामपंचायत व सामाजिक कार्यकर्त्या कडून करण्यात येत आहे. परंतु महावितरण कार्यालयातील ढिसाळ कारभारामुळे आज ही तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत हद्दीत जैसे थे परिस्थिती आहे. त्यामुळे पावसाळ्यात वारंवार विद्युत वाहक तारा तुटण्याचा व पोल पडण्याच्या घटना घडत आहेत. त्यात मागील तीन महिन्यांपासून विद्युत धारक ग्राहकांना देण्यात येणारे

.../२

## संक्षिप्त...

### मुंबई केंद्रशासित करण्याचं षडयंत्र : राऊत

शिवसेना नेते संजय राऊत आणि भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यात चांगलाच राजकीय सामना रंगला आहे. किरीट सोमय्यांच्या तक्रारीनंतर ईडीने संजय राऊत यांच्यावर कारवाई करत त्यांच्या संपत्तीवर टाच आणली. त्यानंतर, संजय राऊत यांनी सोमय्यांवर गंभीर आरोप केले आहेत. सोमय्या हे महाराष्ट्रद्रोही आणि देशद्रोही असल्याचे सांगत मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचं मोठं षड्यंत्र असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

आयएनएस विक्रांत युद्धनौका वाचवण्यासाठी जमा केलेल्या निधीवरून भाजप नेते किरीट सोमय्या आणि शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. सोमय्या राजभवनात निधी गोळा करणार होते. तो निधी गेला कुठे असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला. सोमय्यांनी ५८ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे राऊत यांनी म्हटले होते. त्यानंतर, आता १४० कोटी रुपयांचा घोटाळा असल्याचं ट्विट व्हायरल झालं आहे. दरम्यान, राऊत यांनी किरीट सोमय्यांवर गंभीर आरोप केले आहेत.

''मुंबई केंद्रशासित कशी करता येईल यासाठी भाजपाच्या पाच लोकांना सादरीकरण तयार केलं असून ते गृहमंत्रालयाला दिलं आहे. मुंबईतील काही धनिक, भाजपाचे नेते आणि बिल्डर यांच्या संगनमतानं हे सुरु असून किरीट सोमय्या यांचं नेतृत्व करत आहेत'', असा गौप्यस्फोट राऊत यांनी केला आहे.

## जेएनपी विद्यालयाच्या शुल्क वाढीला पालकांचा विरोध

### वाढीव शुल्क न भरण्याचा पालकांचा निर्णय

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपी विद्यालय हे बंदराच्या अनुदानावर चालविले जात असून नव्याने आलेले आर के फॉंडेशन संस्थेने यावर्षीच्या प्रवेशा साठी भरमसाठ शुल्क वाढ केली आहे. या शुल्क वाढीला विद्यालयातील पालक संघटनेने विरोध दर्शविला आहे. या शुल्क वाढी संदर्भात शुक्रवारी जेएनपीए प्रशासन भवनात झालेल्या जेएनपीए अधिकारी, पालक संघटना व शिक्षणसंस्था यांच्या प्रतिनिधीच्या झालेल्या बैठकीत पालकांनी कोणतेही वाढीव शुल्क न भरण्याचा निर्णय जाहीर केला आहे. तसेच जेएनपीए ने वाढीव शुल्काची जबाबदारी घेण्याची विनंती प्रशासनाला केली आहे.

जेएनपीए ने आपल्या कामगारांच्या पाल्याना शिक्षण मिळावे या करिता कामगार वसाहती १ली ते १० पर्यंतचे।विद्यालय सुरू करण्यात आले आहे. हे विद्यालय चालविण्याचे काम पूर्वी इंडियन एज्युकेशन सोसायटी कडे होते ते सध्या आर के फाऊंडेशन या संस्थेला देण्यात आले आहे.

या संस्थेने नव्या शुल्क वाढीचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात जेएनपीए चे सचिव व वरीष्ठ व्यवस्थापक जयवन्त ढवळे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, जेएनपीटी कामगार विश्वस्त भूषण पाटील, शिक्षक नेते नरसू पाटील सर, कामगार नेते रवींद्र पाटील, दिनेश पाटील, पालक संघटनेचे किरण घरत तसेच आर के फाऊंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जेएनपी विद्यालयात येथील स्थानिक भूमिपुत्रांची मुलं मुली शिक्षण घेत असून त्यांच्यावर शुल्क वाढ अमान्य असून सामाजिक जबाबदारी म्हणून जेएनपीए प्रशासनाने शुल्काचा भार उचलावा आम्ही वाढीव शुल्क भरणार असल्याचे पालकांनी स्पष्ट केले. तर राज्य सरकारच्या नियमांच्या आधीन राहून शुल्कवाढ केल्याचा तसेच यामुळे सध्याच्या शिक्षण घेत असलेल्या एकाही विदयार्थ्यांना शुल्क भरावे लागणार नसल्याचा दावा आर के फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी केला.

त्यानंतर नव्या संस्थेचे हस्तांतरण, अनियमित शिक्षकांना नियमित करण्याचे, शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन आदी विषयावर ही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## म्हसळा शिवसैनिकांकडून किरीट सौमया यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी 'सेव्ह विक्रांत' या मोहिमेच्या नावाखाली लाखो मुंबईकरांचा पैसा लुबाडल्याचा गंभीर आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केला. त्यानंतर किरीट सोमय्या यांच्याविरोधात शिवसेनेच्या वतीने राज्यभरात निषेध व्यक्त केला जात आहे. त्या अनुषंगाने म्हसळा तालुक्यात शिवसेनेच्या पदाधिकारी आणी कार्यकर्त्यांनी म्हसळा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक उद्धव सुर्वे यांची भेट घेतली.

महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांवर किरीट सोमैयांकडून सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. मात्र, शिवसेना खासदार संजय राऊत यांनी किरीट सोमैयांनी आयएनएस विक्रांतचे संग्रहालय करण्यासाठी सर्व सामान्यांकडून जमवलेला कोट्यवधींचा निधी राज्यपालांना दिलाच नसल्याचे प्रकरण उघडकीस आणले आहे. सोमैयांचा नवा घोटाळा असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी तालुका प्रमुख सुरेश कुडेकर यांनी लेखी अर्जाद्वारे उद्धव सुर्वे यांच्याकडे केली.यावेळी माजी सभापती रवींद्र लाड, माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के, शहरप्रमुख तथा नगरसेवक अनिकेत पानसरे, बाळा म्हात्रे, युवासेना तालुका अधिकारी अमित महामुनकर, दिपल शिर्के, प्रसाद बोर्ले, प्रसन्ना निजामपूरकर उपस्थीत होते.

## नागोठणे जवळ रेल्वे अपघातात तरुणीचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे नागोठणे मिरानगर भागातील रेल्वे रुळ स्टोन क्र.१२८/१४ या ठिकाणी रेल्वे रुळ क्रॉस करत असताना रेल्वेची धडक लागल्याने १७ वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाला.

या अपघाता संदर्भात नागोठणे पोलीसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार नागोठणे जवळील कोंडगाव येथे राहणारी तरुणी कृतिका रोहिदास धामणे (वय - १७ वर्षे) ही दि. ८ रोजी १२ ते १ वाजण्याच्या सुमारास नागोठणे बाजूकडून आपल्या कोंडगाव येथील घरी रेल्वे मार्गाने जात असताना मौजे मिरानगर ते मुरावाडी रेल्वे मार्गाच्या दरम्यान रुळ क्रॉस करत असताना पोरबंदर - कुचुवेली या रेल्वे गाडीची ठोकर लागल्याने तिच्या डोक्याला गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. बी.डी. भायदे हे करीत आहेत.

## मुरुड तालुक्यात खळबळ ; तालुका अध्यक्षांचा राजीनामा

### तालुक्यातील राष्ट्रवादी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांच्या समवेत आपापल्या पदाचे राजीनामे दिले असल्याने मुरुड तालुक्यात खळबळ उडाली आहे. तालुक्यातील पक्षाच्या माध्यमातून होणारी विकासकामे पक्ष कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता डावलून करत असल्याने सर्वांनी तालुका सचिव विजय पैर यांच्याकडे राजीनामे दिले. जिल्हा अध्यक्षांकडे हे राजीनामे सादर करण्यात आले असल्याचे समजते.

अचानक तडकाफडकी तालुक्यातील तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांच्यासह सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे मुरुड तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी असे सांगितले की मुरुड तालुक्यामधील जिल्हा परिषद व पक्षाच्या निधीतून केली जाणारी विकास कामे या संदर्भात तालुका अध्यक्ष व राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते यांना विश्वासात न घेता ना विरोधकांची कामे करत असल्याने पक्षावर नाराजी व्यक्त करीत एक मताने सर्व पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले.

पक्ष श्रेष्ठी व नेत्यांकडून सातत्याने त्यांना व त्यांनी सुचविलेल्या कामांकडे दुर्लक्षित केले जात असल्याचे तसेच शिष्टाचार मोडून काहींनी गटातटांचे राजकारण सुरु केल्याने त्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होत असल्याचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले. दि.०६ एप्रिल २०२२ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष मंगेश दांडेकर यांचे काही नेते त्यांच्या कार्याक्रमाची शोभा वाढविण्यासाठी शिष्टाचार डावलून तालुकाध्यक्षांना न सांगता खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांना थेट भेटून आपली कामे करून घेत आहेत.

ही बाब अतिशय चिंतेची आहे,कामे करणारे व इतर पक्षात सक्रीय भूमिका ठेवणारे विरोधक राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्यांची आड घेऊन देवचंद असल्याचे अनेक वेळा घडलेले आहे या कारणास्तव सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुरुड तालुका पदाधिकारी यांनी राजीनामे दिले आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी अचानक राजीनामे दिल्याने राजकिय गोटात खळबळ उडाली असून यात पक्षाचे वरिष्ठ कोणती भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

# शिक्षणहक्कांचा संकोच

एखादा कल्याणकारी कायदा लागू केल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी पुरेसा निधी न देणे किंवा यंत्रणा न उभारणे, हे आपल्याकडील प्रशासनाचे एक व्यवच्छेदक लक्षण. योजना चांगल्या असूनही त्या अयशस्वी ठरण्याचे खरे कारणही यातच दडलेले आहे. केंद्र आणि राज्यांमधील सरकारे कितीही वेळा बदलली, तरी या स्थितीत फरक पडलेला नाही. सर्वसामान्यांना याची सवय झाली असून, विशिष्ट निमित्ताने अधूनमधून चर्चा होते खरी; परंतु सुधारणा होत नाही. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातच सुरू असलेल्या सुनावणीच्या वेळी, 'शिक्षण हक्क कायदा (आरटीई) केला खरा; परंतु शाळा कोठे आहेत,' असा रोखठोक सवाल न्या. उदय लळित यांच्या खंडपीठाने करून, शिक्षणहक्क आणि शाळांचा मुद्दा चर्चेत आणला आहे. कल्याणकारी कायदे करताना आर्थिक परिणामांचा विचार झाल्यास ते केवळ देखाव्यापुरते मर्यादित राहत नाहीत, असे मत मांडताना न्या. लळीत यांनी 'आरटीई'चे उदाहरण देत केंद्र सरकारला अवांछित सल्ला दिला. 'आरटीई'मुळे सहा ते चौदा या वयोगटातील मुला-मुलींना शिक्षणाचा हक्क मिळाला असला, तरी शाळा आणि शिक्षक यांची संख्या कमी असल्याने, अनेक जण या हक्कापासून वंचित राहत असल्याकडे सर्वोच्च न्यायालयाने अंगुलिनिर्देश केला आहे. वास्तविक, सरकारी आकडेवारी आणि विविध अहवालांतून याबाबतची वस्तुस्थिती नियमितपणे समोर येत आहे; परंतु ती बदलण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करण्याऐवजी, 'आरटीई'चा संकोच होईल अशी पावले धोरणकर्ते टाकत असल्याने, न्यायालयाच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष होण्याचीच शक्यता अधिक. प्राथमिक शिक्षण घेण्यायोग्य वयोगटात असलेल्या सुमारे २६ कोटी मुलांच्या भवितव्याशी संबंधित मुद्द्यावर म्हणूनच चर्चा व्हायला हवी. देशात शिक्षण हक्क कायदा होणे, ही निश्चितच ऐतिहासिक घटना होती. महात्मा जोतिबा फुले यांनी हंटर आयोगाला दिलेल्या साक्षीत याबाबत पहिली मागणी केली; ती प्रत्यक्षात येण्यासाठी सव्वाशे वर्षांहून अधिक काळ लागला. आज या कायद्याला एक तप उलटले असले, तरी त्याच्या अंमलबजावणीत अडचणी आहेत. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण केले जात असल्याचीच चर्चा या कायद्यामुळे अधिक होते. परीक्षा केंद्रीत शिक्षण यंत्रणा आणि परीक्षांतील गुणांनाच दर्जा मानण्याच्या मानसिकतेतून होणाऱ्या या चर्चेच्या पलीकडे जाऊन, 'आरटीई'च्या अंमलबजावणीच्या अडचणींचा विचार होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे गुणोत्तर 'आरटीई'मुळे निश्चित झाले; तसेच सामाजिक आणि आर्थिक कमकुवत घटकांसाठी खासगी शाळांत २५ टक्के आरक्षण मिळाले हे खरे; मात्र या दोहोंबाबत अडचणी दिसत आहेत. देशातील सुमारे १५.५१ लाख शाळांपैकी १.१० लाख शाळा एकशिक्षकी असून, शिक्षकांच्या सुमारे ११.१६ लाख जागा रिक्त असल्याचे गेल्या वर्षीच्या अहवालातून स्पष्ट झाले होते. संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) 'नो टीचर, नो क्लास' या नावाने हा अहवाल प्रसिद्ध केला होता. एकशिक्षकी शाळांपैकी ८९ टक्के शाळा आणि शिक्षकांच्या रिक्त जागांपैकी ६९ टक्के जागा ग्रामीण भागात आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील तफावत यातून अधोरेखित होते. पहिली ते आठवी या प्राथमिक स्तरावर देशातील सुमारे २६ कोटींपैकी दहा कोटी (अंदाजे ४० टक्के) मुले-मुली सरकारी शाळांमध्ये जातात. प्रामुख्याने ग्रामीण भागातील; तसेच गरीब आणि वंचित घटकांतील मुला-मुलींच्या शिक्षणाला फटका बसत असल्याचे यातून स्पष्ट होते. सर्वोच्च न्यायालयाने मांडलेला तरतुदीचा मुद्दा यामुळे अधिक ठळकपणे समोर येतो. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची कोठारी आयोगाची शिफारस गेल्या साठ वर्षांत कधीच अमलात आणली गेलेली नाही. आता तर शिक्षणावरील तरतूद कमी होत चालली असून, बहुचर्चित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात याबाबत फक्त एकदाच उल्लेख करण्यात आला आहे. शिक्षणावरील खर्चासाठी सरकार कटिबद्ध नसल्याचे यातून दिसते. सरकारी आणि खासगी क्षेत्र यांचा शिक्षणावरील एकत्रित खर्च 'जीडीपी'च्या सहा टक्के असल्याची कुजबूज आता सुरू आहे. 'परवडत असेल त्या सर्वांनी खासगी शाळांतून महागडे शुल्क भरून शिक्षण घ्यावे,' असा अधिकृत सल्ला देणेच बाकी राहिले आहे. शिक्षण हक्क कायद्याचा संकोच होईल, असे अनेक मुद्दे नवीन शिक्षण धोरणात आहेत. हे मुद्दे मागे घेऊन 'आरटीई'च्या प्रभावी अंमलबजावणीचा आग्रह सर्व स्तरांतून व्हायला हवा. काही शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते हेच याबाबत प्रामुख्याने आवाज उठवित असले, तरी त्यांना इतर समाजघटकांकडून पाठिंबा मिळायला हवा. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या भाष्यामुळे चर्चेत आलेल्या या विषयाबाबत समाजातून आग्रह वाढायला हवा; अन्यथा शिक्षणहक्कांचा आणखी संकोच होण्याचा धोका आहे.

# परंपरा जपणारी तळाघर येथील प्रसिद्ध स्वयंभू महादेवाची यात्रा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेली, महाराष्ट्रातील आगळीवेगळी बहुजन समाजाच्या प्रथा, परंपरा जपणारी तळाघर येथील प्रसिद्ध असलेली स्वयंभू महादेवाची यात्रा राम नवमी उत्सव सोहळा ९ते १०एप्रिल ला आहे . या यात्रेत महादेवाचे लग्न आणि त्यानंतर छबिना हे प्रामुख्याने विधिवत पध्दतीने कार्यक्रम होतात. ते पाहण्यासाठी रायगड जिल्हाभरातून तळा, मुरुड, रोहा, श्रीवर्धन, म्हसळा आदी तालुक्यासह विविध ठिकाणाहून तर विषेशतः ग्रामीण भागातून भाविक मोठ्या संख्येने या ठिकाणी या शिवलिंगाचे दर्शना साठी व तीर्थ ग्रहण करण्यासाठी तसेच यात्रेसाठी गर्दी करतात. प्रसाद म्हणून दिले जाणारे या यात्रेचे स्वरूप म्हणजे चिंबोरीचे काळवण हे या यात्रेचे वैशिष्ट्य मानले जात आहे.तर बहुसंख्येने कोळी बांधव यावेळी खाऱ्या पाण्यातील चिंबोरीचा व्यवसाय करतात.



या यात्रेत महादेवाच्या विवाहाचे सर्व धार्मिकविधी, मानपान बहुजन समाजाद्वारे व त्यांच्या चाली रीती प्रमाणे करण्यात येतात. जत्रेच्या काठ्या हे या यात्रेचे आकर्षण असते. या यात्रेत कोळी बांधव आणि महादेववाडीच्या सुतारांची गळाभेट घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने यात्रेकरू पायी येतात. लग्न विधी करण्यासाठी परिसरातील सात गावचे जंगम येतात. रात्री बारा वाजता खारगावच नवरा आणि धाटावची नवरी असा हा आगळा वेगळा आणि महत्वपूर्ण विवाह सोहळा व लग्नाचा मुहूर्त असतो. विधीसाठी लागणारी मातीची भांडी दमखाडीचे कुंभार देतात.तळाघरचे मोरे दीपमाळ लावतात. खारगांव येथून पालखी येते. बामुगडे घराणा मानाची निमंत्रणे द्यायला जातो. सोनगावचे ग्रामस्थ तेलवण, वरातीचे आमंत्रण देतात. धाटावहून काठी तेलवणाच्या दिवशी येते. पालखीला तारेगावचे भोई असतात. मग शिवपार्वतीची जत्तर काठीवर प्रतिष्ठापना होते. वारळची काठी मंदिरासमोर उखळात उभी करतात.

सुतार भगत महादेवाची मूर्ती मांडीवर घेऊन विवाहास बसतात. शेजारी धाटावचे रटाटे असतात. किल्ल्याची करवली, तळाघरचा करवला उभा असतो. यावेळी स्थानिक पोलीस पाटलांना विशेष मान असतो. मंगलाष्टका धाटाव, लांढर, भुवेनश्वर, देवकान्हेचे जंगम म्हणतात. असा हा सोहळा दोन दिवस रंगतो. या सर्व प्रथा-परंपरा पाहण्यासाठी दरवर्षीप्रमाणे भाविकांची प्रचंड गर्दी या यात्रेत पाहावायास मिळतात व आनंद घेता येतो तसेच ही यात्रा यशस्वी करण्यासाठी धाटाव पंचक्रोशीतील सरपंच, सदस्य, तळाघर ग्रामस्थ, पंचक्रोशी, यात्रा समिती अत्यंत तळमळीने व भावनेने परिश्रम घेतात.

यात्रेला पारंपरिक पद्धधतीचा ऐतिहासिक वारसा असल्याने या यात्रेला ऐतिहासिक वारसा असल्याचे पुरावे आहेत. जंजिरा संस्थानच्या सिद्दीची आई ही महादेवाची भक्त होती असा उल्लेख आहे. तर यात्रेचे मानसन्मान हे शिवकालीन असल्याचे सांगितले जाते. पेशवे आणि सिध्दी यांच्यात झालेल्या करारात या तळाघर यात्रेचा उल्लेख असल्याचे बोलले जाते. मागील दोन वर्ष कोरोना संसर्गामुळे हा कार्यक्रम शासनाच्या नियमाप्रमाणे साध्या पद्धतीने करण्यात आले परंतु या वर्षी सर्व अटी शर्थी शिथिल करण्यात आल्याने या वर्षी संपन्न होत असलेल्या या महादेवाची यात्रा व उत्सव सोहळा व जत्रा मोठया उत्साहात संपन्न होत असल्याचे दिसून येत असून यात बहुसंख्येने व्यवसाय करणारे छोटे मोठे दुकानदार मिठाईचे दुकान, चहा वडा पाव,पाणी पुरी, आइस्क्रीम,फळ विक्रते, चिंबोऱ्या, चुकी मासळी,सह लहान मुलांना व यात्रेकरूंचे मनोरंजन करणारे आगस पाळणे चक्कर,मोटर सायकर स्वार असे विविध खेल दोन दिवस आधीपासूनच या ठिकाणी पोहचले आहेत तसेच यासाठी धाटाव पंचक्रोशीतील धाटाव, तळाघर, महादेववाडी, वाशी, लांढर, बोरघर,निवी,किल्ला सह परिसरातील आदी ग्रामस्थ सदरच्या राम नवमी उत्साह यशस्वी करण्यासाठी व येणाऱ्या भाविक भक्तगण यात्रेकरूंसाठी महादेवाचे दर्शनाचा लाभ मिळावा याकरिता जय्यत तयारी करत आहेत.

# झोपडपट्टी धारकांचे घराचे स्वप्न कोसो मैल दूर ; सिडको हद्दीतील झोपडपट्टीमधील वस्तुस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील झोपड्यांचे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्या संदर्भामध्ये सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून आर्थिक तरतुद सुद्धा करण्यात आलेलीली आहे. त्यामुळे झोपडपट्टीवासियांचे आपल्या घराचे स्वप्न साकार होण्याच्या मार्गावर आहे. असे असले तरी सिडको हद्दीतील झोपड्यांच्या पुनर्वसनाबाबत अद्यापही पाऊले उचलण्यात आले नाहीत. याबाबत सिडकोने आपले धोरण स्पष्ट केले नाही. पंतप्रधान आवास योजनेच्या इमारती उभ्या राहत असल्या तरी त्यामध्ये झोपडपट्टीधारकांना घरे मिळणार की नाही असा प्रश्न उभा राहिला आहे. सिडकोच्या बोटचेपी धोरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

पनवेल परिसरात घरांच्या किंमती गगनला भिडल्या आहेत. त्याचबबरोबर घरभाडेही जास्त आहे. ते मजुरी करणाऱ्या खिशाला परवडणारे नाही. त्यामुळे मोकळया ठिकाणी झोपडया बांधून हे आर्थिकदृष्टया गरीब लोक राहतात. पनवेल शहरात अनेक वर्षापासून झोपडया आहेत. त्याचबरोबर सिडको वसाहतीत सुध्दा जुन्या झोपडया आहेत. ज्यांना घर नाही त्यांना घर देण्याचे धोरण शासनाने अवलंबले आहे. पंतप्रधान आवास योजनेर्तंगत पनवेल महापालिकेने झोपडपट्टी निर्मुलनाकरीता पाऊल उचलले आहे. त्यानुसार शहरातील वाल्मिकी नगर, इंदिरा वसाहत, महाकाली नगर,लक्ष्मी वसाहत,अशोक बाग, तक्का येथील वैदू आणि कातकर वाडी,कच्छी, पटेल मोहल्ला,विश्राळी नाका, शिवाजी नगर, मार्केट यार्ड, बावन बंगला, आझाद नगर, भास्कर वाडी या ठिकाणांना महापालिकेने झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे. त्याच बरोबर या ठिकाणच्या झोपडपट्ट्यांचे पंतप्रधान आवास योजना अंतर्गत पुनर्वसन करण्याचा ठराव पनवेल महापालिकेने संमत केला आहे. त्यानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करून एजन्सी नियुक्त करण्यात आलेली आहे. लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. याकरता पनवेल मनपाने अर्थसंकल्पामध्ये तरतुद सुद्धा केली आहे. सिडको हद्दीतील झोपड्यांचा प्रश्न आधारितच याबाबत सिडको आणि महापालिकेची बैठक सुध्दा झाली होती.मात्र सिडको वसाहतीतील झोपडयाचे आम्ही पुर्नवसन करू असे सिडकोकडून सांगण्यात आले.खांदा वसाहतीत उपमहापौर सिताताई सदानंद पाटील यांनी पनवेल शहराप्रमाणेच सिडको हद्दीतही झोपडपट्टी क्षेत्र घोषीत करण्याची मागणी महापालिकेकडे केली होती.त्यांचे पुर्नवसन सुध्दा विचारात घ्यावे असा मुद्दा उपस्थित केला होता. त्याचबरोबर त्यांनी सिडकोकडे याबाबत पाठपुरावा केला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून येथील झोपडपट्टीवासीयांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने त्या अग्रभागी आहेत. त्यानुसार त्यांनी सिडकोकडे सातत्याने पत्रव्यवहार केला आहे.

# नवीन पनवेलमध्ये शाळेच्या बाहेर होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत मनसे आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र सरकारने २ एप्रिल २०२२ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कोरोनाचे संपूर्ण निर्बंध उठवले आहेत. त्यामुळे विभागातील सर्व आस्थापना शाळाला इतर कार्यालय १००% क्षमतेने सुरू झाले आहे. तसेच आपल्या विभागातील शाळा या गजबजीच्या ठिकाणी असून शाळा चालू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळात शाळेच्या आवारात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. डीएव्ही स्कुल आणि होरिझन स्कुल येथे प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा नाहक त्रास शाळेतील लहान मुले व त्यांच्या पालकांना होत असून इतर प्रवासी सुद्धा यामध्ये अडकून पडत आहेत. या वाहतूक कोंडी विरोधात नवीन पनवेल येथील मनसे आक्रमक झाली आहे त्यांनी शाळा वाहतूक विभागाला वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विनंती केली आहे.

शाळा सुरू झाल्याने नवीन पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. जागा मिळेल तशी कुठेही व कोणत्याही ठिकाणी वाहने पार्क केली जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. मनसे विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष अनिकेत मोहिते व सचिन जाधव( वाहतूक चिटणीस) यांच्या नेतृत्वाख़ाली व पराग बालड यांच्या मार्गदर्शनाख़ाली संबंधित प्रशासनाला पत्र देऊन शाळेने सुरक्षा रक्षक ठेऊन मुलांना सुरक्षित बाहेर काढावे व शाळेसमोर वाहतूक कर्मचाऱ्यांची नेमणूक करून वाहतूक कोंडी सोडवावी अशी मागणी करण्यात आली आहे. जेणेकरून लहान विद्यार्थी व पालक यांना मनस्ताप होणार नाही अशी विनंती यावेळी करण्यात केली. यावेळी मंदार गोसावी (उपशहर अध्यक्ष मनविसे), शार्दूल थोपटे, किरण गावडे, सौरभ पाटोळे, प्रफुल्ल कांबळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# खांदा वसाहतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती होणार मोठ्या उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त खांदा कॉलनीतीलभारतीय बौध्द महासभा ( विभाग क्र - १०), बौध्दजन पंचायत समिती ( शाखा क्र - ७४१), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, सांस्कृतिक मंडळ, जीवन ज्योती ज्येष्ठ नागरिक संघ, धम्मयान संस्था, त्रिरत्न बौद्ध महासंघ, ब्लू लाईन युनीटी असोसिएशन, भीमशक्ती युवा फोर्स, भीमयुवा मित्र मंडळ, छत्रपती क्रांती सेना, अखिल भारतीय छावा संघटना, परिवर्तन सामाजिक संस्था, जागृत,सोच फाउंडेशन महिला मंडळ, आझाद कामगार संघटना या सर्व संस्था एकत्र येऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती खांदा कॉलनी २०२२ या नावाने जोरदार साजरी करणार आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढणार आहेत. तसेच सर्वानुमते कामगार नेते महादेव वाघमारे यांची जयंती महोत्सव समितीचे अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पहिल्यांदाच खांदा कॉलनीत असा बदल घडून सर्वांनी एकत्र येऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली जात असून तरुण, ज्येष्ठ,महिला असा सर्वांनी उत्साहात जयंती कार्यक्रमास सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

१३ एप्रिल रोजी तक्षशिला बुद्धीविहार सेक्टर ९ येथे निबंध,चित्रकला, नृत्य, गायन ,वकृत्वस्पर्धा तर १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ध्वजारोहन व बुद्ध वंदना ११ वाजता व्याख्याते गोपाळ गंगावणे यांचे व्याख्यान होणार आहे. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता तक्षशिला बुद्ध विहार सेक्टर ९ खांदा कॉलनी येथून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मिरवणूक निघणार आहे तरी जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा असे आव्हान जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी केले आहे

# देवाची भक्ती ही सतत वाहणाऱ्या पाण्याच्या झऱ्या प्रमाणे करा : ह.भ.प. दळवी महाराज गुरुजी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



खरी भक्ती देवा पर्यंत पोहचायची असेल ती भक्ती जाणते पणांनी करा ज्याच्या भक्तीत सातत्य असते.तीच भक्ती देवापर्यँत पोहचते. ज्या प्रमाणे पाण्याचा झरा कधीही अटत नाही.डपके आटेल पण पाण्याचा झरा लागलेली विहीर कधीही आटत नाही त्या पाण्याच्या झऱ्यात सातत्य आहे.याप्रमाणे भक्ती मध्ये रममान झाले पाहिजे असे मत धामणसई पंचक्रोशी येथील आयोजित किर्तन सेवेत ह.भ.प दळवी महाराज गुरुजी यांनी जाणे भक्तीचा जिव्हाळा ।तोचि दैवाचा पुतळा ।।१।।आणीक नये माझ्या मना ।हो का पंडित शाहाणा ।।ध्रु.।।नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ।।२।।तुका म्हणे नवविध । भक्ती जाणे तोचि शुद्ध ।।३।।या जगद गुरु तुकाराम यांच्या अभंगाच्या आधारे स्पष्ट केले.

खरोखरच ज्याची भक्ती अतिशय जिव्हाळ्याचे आहे तो दैवाचा पुतळाच आहे.त्याच्या वाचून इतर कोणी शहाणा पंडित असेल,तरी ते मोठे दैववान आहेत असे माझ्या मनाला पटत नाही. हरीच्या नामारुपाच्या ठिकाणी ज्याचे मन जडले आहे,त्याच्या आधीन असा मी त्याचा दासच आहे. तुकाराम महाराज म्हणतात जो श्रवण,कीर्तन,मनन इत्यादी नऊप्रकारची भक्ती करणे जाणतो ,तोच मनुष्य खरा शुद्ध मानावा.

यावेळी मृदूंग सम्राट सुनिल मेस्त्री सर पोलादपूर, गायनाचार्य ह.भ.प.प्रणित सुतार, नरेश दळवी, दिपक दळवी, अविनाश भोसले,रघुनाथ भोकटे, नाना देशमुख, दिलीप कदम, महादेव सानप, महादेव महाबळे, प्रदीप महाबळे, नारायण लोखंडे, महेश तूपकर, तसेच धामणसई पंचक्रोशीतील असंख्य नागरिक उपस्थित होते.

या वर्षी धामणसई येथील पंचक्रोशीचा ३९ वा वर्षे असून काही कारणांमुळे हा सप्ताह बंद होता तो सर्व पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील नागरिक एकत्र येऊन सात वर्षांनी हा सप्ताह सुरु करून धामणसई येथे पुन्हा एकदा जणू पंढरीच उतरली असल्याचे दिसून येत असून हा सप्ताह यावर्षी दहा दिवस सुरु राहणार असून सर्व कार्यक्रम यसश्विकारण्यासाठी ग्रामस्थ मंडळ, तरुण वर्ग, समस्थ धामणसई महिला मंडळ अथक परिश्रम घेत आहेत.

# रायगडचे अरुण लक्ष्मण पाटकर महाराष्ट्र राज्य पावर लिफ्टिंग संघाचे व्यवस्थापक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिनांक ०९/४/२०२२ ते १३/४/२०२२ या कालावधीत केरळ -अल्लेपुझ्झा येथे होणार असलेल्या राष्ट्रीय क्लासिक पावर लिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघ व्यवस्थापक म्हणुन अरुण लक्ष्मण पाटकर यांची निवड झाली आहे.

अरुण पाटकर यांची निवड झाली असल्याने रायगड जिल्हा पावरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष गिरीष शरद वेदक, सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, तसेच संदीप कृष्णा पाटकर, राहुल विजय गजरमल आणि शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मारुती आडकर सर यांनी अभिनंदन करून पुढील कामासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील बंदररोड परिसरात कामानिमित्त आलेली एक विवाहित महिला कोणाला काहीच न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

सौ. फरजाना अब्दुल हातोडकर (वय ४४) रंग सावळा , अंगाने मध्यम , उंची ५ फूट २ इंच , केस काळे पांढरे असून अंगात नारंगी रंगाची सलवार ब्राऊन रंगाचा लेहेंगा व ब्राऊन रंगाची ओढणी सोबत क्रीम रंगाची पर्स व मोबाइलला फोन आहे. या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२- २७४५२३३३ किंवा पो. ना. यु . बी . पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# उरण येथील महावितरण कार्यालयात इलेक्ट्रॉनिक मीटरचा तुटवडा

इलेक्ट्रॉनिक मीटर कार्यालयाकडून उपलब्ध होत नसल्याने ग्राहकांना इलेक्ट्रॉनिक मीटर साठी खाजगी दुकानावर जास्त पैसे मोजून इलेक्ट्रॉनिक मीटर खरेदी करावा लागत आहे.

एकंदरीत उरण येथील महावितरण कार्यालयातील ढिसाळ कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे व ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी उरण तालुक्यातील महावितरण कार्यालयातील समस्यांचे निवारण करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

यासंदर्भात उरण येथील महावितरण कार्यालयाकडे विचारणा केली असता कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने नाव न शापण्याच्या अटीवर माहिती देताना सांगितले की उरण महावितरण कार्यालयाकडे मीटर उपलब्ध झाल्यावर त्याचे वितरण हे करण्यात येते. परंतु मागील तीन महिन्यांपासून सदर कार्यालयाकडे मीटर उपलब्ध झाले नाहीत. परंतु ज्या ग्राहकांना विद्युत मीटर हवे असतील त्यांनी खाजगी दुकानावरुन मीटर खरेदी करून, महावितरण कार्यालयाकडे सादर करावे, त्यानंतर महावितरण कार्यालयातील कर्मचारी सदर मीटर ग्राहकांच्या घरात बसविण्याचे काम हाती घेईल.

# रविवारी पनवेलमध्ये 'कृतज्ञ मी कृतार्थ मी' नाटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संस्कार भारती कोकण प्रांत व उत्तर रायगड जिल्हा भाजपा सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १० एप्रिल रोजी सायंकाळी ४. ३० वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित 'कृतज्ञ मी कृतार्थ मी' या नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे.

या नाटकाची प्रवेशिका मोफत असून प्रवेशिकेसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९) किंवा संजीव कुलकर्णी (९९८७०१५६८३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नागोठण्यात राष्ट्रवादी महिला आघाडीकडून प्रतिभा आरोग्य जनजागृती अभियान

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदितीताई तटकरे, आमदार अनिकेतभाई तटकरे, जिल्हा महिला अध्यक्ष उमाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या नागोठणे शहर महिला आघाडी तर्फे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रतिभा आरोग्य जनजागृती अभियान नुकतेच राबविण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाट व त्यांच्या टीमने उपस्थित महिलांची आरोग्य व रक्त तपासणी केली. या आरोग्य शिबिरात रक्तदाब, हिमोग्लोबिन, जीवनसत्त्वे अशा प्रकारच्या तपासण्यांचा सुमारे ४० महिलांनी लाभ घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस आशाताई शिर्के, जिल्हा उपाध्यक्षा अमिता शिंदे, रोहा तालुका उपाध्यक्षा रिचा धात्रक, नागोठणे शहर अध्यक्षा सुजाता जवके, शहर उपाध्यक्षा प्रतिभा तेरडे, राजश्री टके, सुनिता तटकरे आदींसह तपासणीसाठी आलेल्या महिला यावेळी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल जवळील करंजाडे वसाहती मध्ये घडली आहे. करंजाडे सेक्टर ६ अपेक्स वसंत सोसायटी येथे राहणारे ६७ वर्षीय वृद्ध इसम आसाराम काकडे यांनी खिडकीच्या ग्रीलला दोरीच्या साहाय्याने आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## १६ वर्षीय तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काशीबाई झोपडपट्टी साईबाबा मंदिराजवळ, पनवेल येथील घराच्या परिसरातून सोळा वर्षीय साई योगेशकुमार रेड्डी याला कोणीतरी पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अज्ञात आरोपी विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याची उंची पाच फूट, नाक बस्के, अंगाने सडपातळ आहे. त्याचा वर्ण सावळा असून समोरचा वरचा दात अर्धा तुटलेला आहे. त्याने अंगात काळ्या रंगाचे हाफ बाह्यांचे टी-शर्ट, फिक्कट रंगाचे नाईट पॅन्ट व उजव्या कानात बाळी आहे. त्याला मराठी, हिंदी व तामिळ भाषा बोलता येते. तो बोबडे बोलतो. याबाबत अधिक माहिती असल्यास शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक दीपक शेळके यांच्याशी संपर्क साधावा.

## अंध मुलीला लॅपटॉप भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्नेहकुंज आधारगृह, नेरे येथे अंध मुलगी निवेदिता प्रमोद कुडवळकर या मुलीला लॅपटॉप भेट देण्यात आला.

नेरे येथील नितिन जोशी यांची या मुलीची कामोठे येथे एका कार्यक्रमात भेट झाली. हि मुलगी अंध आहे हे त्याना माहीत नव्हते. तीचं सुंदर असे गाणे ऐकत असताना तीला बक्षीस देण्यात आले. त्यावेळेस तेथील निवेदकाने सांगितले कि ती अंध मुलगी आहे. यावेळी जोशी हे तीच्या पालकांना भेटलो व काही मदत लागल्यास सांगा यावेळी त्यानी सांगितले कि तीला लॅपटॉपची गरज आहे. ती आवाज ऐकून अभ्यास करेल असे तीच्या पालकांनी सांगीतले. हि गोष्ट जोशी यानी त्यांच्या मित्राना सांगितली, ते लगेच तयार झाले. व या मुलीला लॅपटॉप भेट देण्यात आला. लायन्स क्लब ऑफ न्यू पनवेल स्टिल टाऊन आणि स्नेहकुंज आधार गृह नेरे यांच्या वतीने तीला लॅपटॉप भेट देण्यात आला. या कार्यक्रमास मिलींद पाटील (अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स), उमेश जाधव, हेमंत लोणकर, रेखा लोणकर, रमाकांत म्हात्रे (अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ न्यू पनवेल स्टिल टाऊन ), संगीता म्हात्रे, प्रकाश घाडगे, संगीता जोशी (अध्यक्ष, स्नेहकुंज आधार गृह), नितीन नाना जोशी उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पनवेलमध्ये लेकींच्या आरोग्याची काळजी; 'गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण' दोन दिवसीय शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय 'गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण' शिबिराला आजपासून (दि. ०८) सुरुवात झाली. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे असलेल्या या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशनचे संस्थापक चेअरमन डॉ. योगेंद्र सपरु यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ झाला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर डॉ. कविता चौतमोल, कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशनच्या सीईओ अलका बिसेन, कार्यकारी संचालिका डॉ. धनंजया सारनाथ, डॉ. भावना शर्मा, उपमहापौर सीता पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहराध्यक्षा वर्षा नाईक, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेविका राजेश्री वावेकर, डॉ. संतोष आगलावे, डॉ. कृष्णा देसाई, डॉ. राजेश सोनार, क्रीडा शिक्षक डॉ. विनोद नाईक, डॉ. आर. व्ही. येवले, आदी उपस्थित होते.

गर्भाशय मुखाच्या कॅन्सरची तपासणी करण्यासाठी एचपीव्ही नामक चाचणी करावी लागते आणि ही चाचणी महागडी असल्याने महिला वर्ग याकडे दुर्लक्ष करतात.बाजारात या एका चाचणीसाठी सुमारे सात ते नऊ हजार रुपयांचा खर्च येतो.जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार गर्भाशयमुखाचा कॅन्सर हा एचपीव्हीच्या 'हाय रिस्क' प्रकारच्या विषाणूमुळे होतो. महिलांमध्ये सर्वाधिक प्रमाण असलेल्या कॅन्सरमध्ये या कॅन्सरचा दुसरा क्रमांक लागतो. महिलांमध्ये धडकी भरवणारा सर्व्हिकल म्हणजेच गर्भाशय मुखाचा कॅन्सर ही जगभर मोठी समस्या आहे. या कॅन्सरच्या निर्मूलनासाठी ऑक्टोबर २०२१ मध्ये चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत पहिल्या लसीकरण डोस महाशिबिर पार पडले होते. त्या शिबिरात ०१ हजार मुलींचे मोफत लसीकरण झाले होते, त्या पहिल्या डोस घेतलेल्या लाभार्थींना दुसरा डोस देण्यासाठी या शिबिराचे आयोजन ०८ आणि ०९ एप्रिल रोजी करण्यात आले आहे.

प्रतिबंधात्मक लस उपलब्ध असलेला गर्भाशय मुखाचा कर्करोग हा एकमेव कर्करोग आहे. २००८ मध्ये सर्वप्रथम इंग्लंडमध्ये एचपीव्ही लस देण्यास सुरुवात झाली. लसीकरणानंतर गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या रुग्णांमध्ये सुमारे ९० टक्के घट झाली आहे. १४ ते १६ वर्ष वयोगटातील मुलींमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगामध्ये ६२ टक्के, तर १६-१८ वर्ष वयोगटामध्ये सुमारे ३४ टक्के एवढी घट झाली आहे. त्यामुळे या लशीची परिणामकारकता स्पष्ट झाली आहे. जगातील सुमारे तीन लाख महिलांचा गर्भाशय मुखाच्या कर्करोगामुळे मृत्यू होत असल्याचे जागतिक आकडेवारीतून समोर आले आहे. भारतात गर्भाशय मुखाच्या कर्करोगामुळे महिलांचा मृत्यू होण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. गर्भाशय मुखाच्या सर्व प्रकारच्या कर्करोगांसाठी एचपीव्ही विषाणू कारणीभूत आहे. कमी रोगप्रतिकार शक्ती, तंबाखूचे अतिसेवन किंवा धूम्रपान, असंतुलित आहार, मांसाचे सेवन, मद्यपान, लैंगिक संबंधांतून होणारे संसर्ग, मानसिक ताणतणाव, लठ्ठपणा असे जीवनशैलीशी निगडित बदलही या कर्करोगाच्या तीव्रतेला कारणीभूत ठरतात, असे तज्ज्ञ डॉक्टरांकडून सांगण्यात येते. एचपीव्ही लसीकरणामुळे जागतिक स्तरावरील गर्भाशय मुखाच्या कर्करोगात घट झाली आहे. भारतात या कर्करोगाचे प्रमाण हे अल्प उत्पन्न गटांतील महिलांमध्ये अधिक आहे. लशीची किंमत हा भारतातील चित्र बदलण्यामागील मुख्य अडथळा आहे.

त्यामुळे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल तसेच कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशनच्या नेतृत्वाखाली चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरणाचा मोफत उपक्रम राबवून लेकींच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली आहे.

# सागरमाला उपक्रमांतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांचा जेएनपीएने घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए मध्ये 'सागरमाला' अंतर्गत विविध प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. भारत सरकारच्या जहाज वाहतूक मंत्रालयाने २०१५ मध्ये 'सागरमाला' कार्यक्रम सुरू केला होता, ज्यास नुकतीच सात वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, सुद्धा उपस्थित होते. बंदरांचे आधुनिकीकरण आणि नवीन बंदरांचा विकास, बंदर कनेक्टिव्हिटीचा विस्तार, बंदर आधारित औद्योगिकीकरण, किनारपट्टी भागाचा विकास आणि किनारपट्टीवरील जहाजवाहतूक हे 'सागरमाला' कार्यक्रमाचे पाच स्तंभ असून यावर आधारित विविध प्रकल्प जेएनपीए मध्ये सरू आहेत.

सागरमाला' कार्यक्रमामुळे भारतीय बंदरे अधिक कार्यक्षम बनून व कंटेनरचा टर्नअराउंड वेळ कमी करून मोठ्या प्रमाणात माल वाहतूक करण्यास सक्षम झाले आहेत. बंदरांचे आधुनिकीकरण, रेल्वे, रस्ते मार्गांचा विस्तार, क्रूझ पर्यटन, रोरो, रो-पॅक्स, मत्स्यपालन, किनारी भागात पायाभूत सुविधा व कौशल्य विकास यासारख्या विविध क्षेत्रात जेएनपीएने विविध प्रकल्प हाती घेतले आले आहेत. महाराष्ट्राला लाभलेली विस्तीर्ण किनारपट्टी व अफाट व्यापार क्षमतेमुळे महाराष्ट्रात रू. १.०५ लाख कोटी रुपयांचे १३१ प्रकल्प प्रस्तावित आहे.

यावेळी बोलताना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, म्हणाले, बंदर आधारित औद्योगिकीकरणास चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या 'सागरमाला' कार्यक्रमामध्ये जेएनपीए महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. जेएनपीए मध्ये 'सागरमाला' अंतर्गत विविध प्रकल्प सुरू असून सर्व प्रकल्प वाहतूक गतिमान करून लॉजिस्टिक खर्च कमी करणे, बंदरांच्या माध्यमातून आर्थिक विकासास चालना देणे आणि किनारपट्टी भागातील समुदायाचे सशक्तीकरण या चार दृष्टिकोनावर आधारित आहेत.

श्री सेठी पुढे म्हणाले जेएनपीए भारतातील सागरी व्यापार आणि जहाज वाहतूक उद्योगासाठी प्रमुख उत्प्रेरक असून, चौथे कंटेनर टर्मिनल, जेएनपीए एसईझेड, वर्धा आणि जालना येथील ड्राय पोर्ट्स, अतिरिक्त लिक्विड कार्गो जेट्टी व यासारख्या विविध प्रकल्पांमुळे बंदराच्या व्यवसायात सुलभता वाढेल आणि भारतीय आयात-निर्यात व्यापार अधिक उंचीवर पोहचेल.

पत्रकार परिषदेदरम्यान, सागरमाला कार्यक्रमांतर्गत जेएनपीएने हाती घेतलेल्या विविध प्रकल्पांचे व्हिडिओ सादरीकरण माध्यमांसमोर सादर करण्यात आले, त्यानंतर अध्यक्षांसोबत संवाद सत्र झाले. देशाच्या अर्थव्यवस्थेत सागरी पायाभूत सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात; 'सागरमाला व्हिजन २०३०' च्या अनुषंगाने, 'सागरमाला' उपक्रमामुळे पायाभूत सुविधांना अधिक चालना मिळेल आणि व्यापार वाढीस सहाय्यभूत प्रादेशिक संपर्क सुधारण्यासाठी मोठी गुंतवणूक होईल. सागरमाला उपक्रमामुळे भारतीय बंदरे जागतिक मानकांची पूर्तता करण्यास सक्षम होतील आणि देशाच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

## थंडाव्यासाठी गुरांना झाडांच्या सावलीचा आधार



**दै.रायगड नगरी । कोलाड**

मार्चपासून उष्णतेची मोठी लाट पसरली असून दिवसेंदिवस उष्णतेचा पारा चढत्या अंशावर जात असल्याने सजीव सृष्टी हैराण झाली आहे. वन्यप्राणी आणि पाळीव प्राणी पाण्यासाठी आणि थंडाव्यासाठी इतरत्र शोध घेत आहेत.याप्रमाणे गुरांनी थंडाव्यासाठी अंगाची दाह कमी करण्यासाठी सावलीचा आधार घेत आहेत

यावर्षी उष्णतेने उच्चांक गाठला असल्यामुळे रणरणत्या उन्हाने अनेकांना घायाळ केले आहे. सकाळी १० वाजल्यापासून प्रचंड प्रमाणावर उष्मा जाणवत असल्यामुळे शेतकरी वर्गाला आपल्या शेतीची कामे सकाळी लवकरच उरकावी लागत आहेत.उष्णतेमुळे रस्ते ही ओस पडू लागले आहेत.

पाळीव प्राण्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणावर उष्णतेची झळ पोहचत असून पिण्याच्या पाण्यासाठी आणि थंड हवेसाठी अनेक प्राणी आसरा शोधत आहेत. काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई जरी भासत नसली तरी गुरांच्या वैरणीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भासत आहे. मोकाट गुरांना सुद्धा वैरणीचा प्रश्न मोठया प्रमाणावर जाणवत आहे. एप्रिल मध्ये उष्णता प्रमाणापेक्षा जादा जाणवत आहे तर मे महिन्यात काय होणार असा मोठा प्रश्न अनेकांना पडला आहे. ग्रामीण भागात गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न दरवर्षी उद्भवत असल्यामुळे अनेकांनी आपल्या गोठ्यातील जनावरं कमी केली आहेत. एकंदरीत या वर्षाची उष्णता सर्वांना त्रासदायक ठरत आहे.

# माथेरानच्या दुकानाचे नामफलक मराठीत करावेत मनसेची मागणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

माथेरान मधील दुकने तसेच हॉटेलचे नाम फलक मराठीत करावे या करता माथेरान मनसेचे अध्यक्ष संतोष कदम यांनी माथेरानचे अधिक्षक तसेच मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे.

गेल्या काही महिन्यां पासून राज्य शासनाने दुकानांवरील फलक हे मराठीत असावेत असा अध्यादेश काढला आहे परंतू आजही माथेरान काही दुकानदार तसेच हॉटेल चालक यांचे नामफलक इंग्रजी तसेच इतर भाषेत असून ते मराठी भाषेत करावेत अश्या सूचना कराव्यात अशी मागणी मनसेने निवेदन देऊन केली आहे. यावर मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांनी एक मे महाराष्ट्रदिना पूर्वी सर्व पाट्या मराठीत करण्यात येतील असे अश्वासन मनसेचे संतोष कदम यांना दिले आहे.



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that 1) Mr. Akshay Bala Sawant & 2) Mrs. Shital Akshay Sawant are the owners of Flat No.03, 1st Floor, Building No. A-14, in the Building known as "KIRTI" and the society known as "Omkareshwar Gruh Sankool CHS Ltd", Admeasuring Carpet area about 231 Sq. ft., Gat No. 31, Hiss No. 0, and Gat No. 32, Hiss No. 0, Village-Bonshet, Tal. Panvel, Dist. Raigad-410206. We came to know that chain of document, i.e. Sale Deed of above said flat executed between 1) Mr. Anand Rajaram Kurware and 2) Mr. Anil B Shendge and Mrs. Savita Anil Shendge, having Reg. No.PVL-3-5714-2015 had been Misplace/Lost while travelling in Kamothe and accordingly lodged a police complaint having Reg. No.476/2022, dated 06.04.2022.

Any Persons, Bank, Financial Institution, Company/Firm having any claim in the said agreement/ properties or any part thereof are hereby required to make the same known to the undersigned at office address given herein below, along with certified copy of the documents pertaining to the claim, within 14 days hereof otherwise any claim arise after the said period, shall be deemed to be waived or abandoned

**Sd/-**
**Adv. Deepa Biju**
**(Advocate High Court)**
Shop No.002, Kohinoor Paradise CHS Ltd,
Plot No.31, Sector-12, Kamothe, Navi Mumbai

## जाहीर नोटीस

मी, **श्री.काळुराम केनाराम चौधरी,** वय : ५४ वर्षे, धंदा : व्यवसाय, भारतीय नागरिक, रा.के.एल-५, बिल्डींग नं.२९, रुम नं.९, सेक्टर ३ ई, कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८, या जाहिर नोटीशीद्वारे असे जाहीर करतो की,

**मिळकतीचे वर्णन**

१) **मेसर्स भुमी कारपॉरेशन व श्री.पंकज राजपाल** यांच्यात दि.१३/०९/२०१२ रोजी झालेल्या ॲग्रीमेंट टु सेलची मुळ प्रत याचा नोंदणीकृत केलेला दस्त क्रमांक उरण-८५२९-२०१२ असा आहे.

२) **श्री.पंकज राजपाल व श्री.अतुल मदनलाल दक** यांच्यात दि.२८/०९/२०१२ रोजी झालेल्या सेल डिडची मुळ प्रत याचा नोंदणीकृत केलेला दस्त क्रमांक पवल-४-३१७-२०१२ असा आहे.

वरील कागदपत्रे ही शॉप नं.१०, तळमजला, भूमी आर्चिड को.ऑप.हौसिंग सो.लि., प्लॉट नं.१८ व १८ अे, सेक्टर-१४, कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ या मिळकती संदर्भातील कागदपत्रे माझ्याकडून दि.२०/०३/२०२२ रोजी कळंबोली भारत गॅस या परिसरात पायी चालत असताना गहाळ झालेली आहे. सदरची कागदपत्रे गहाळ झाल्यासंदर्भात मी दि.०१/०४/२०२२ रोजी कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये जावून हरविलेल्या वस्तूची नोंद क्रमांक ४२५/२०२२ अन्वये तक्रार नोंदविलेली आहे.

मी या नोटीशीद्वारे समस्त जनतेस अशी विनंती करतो की, वर नमूद केलेले दस्तऐवज/कागदपत्रे जर कोणाला मिळून आल्यास ते दस्तऐवज / कागदपत्रे कळंबोली पोलीस स्टेशनला जमा करावीत.

दि.०९/०४/२०२२

**सही/-**
**श्री.काळुराम केनाराम चौधरी**

**ॲड.विजय गडगे, ॲड.के.के.गोंधळी**

## जाहीर समन्स

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
स्पे.मु.नं.२०३/२०२०
नि.नं.२५/ड

**मुरलीधर बाळाराम भोईर** वादी
विरुद्ध
**बाळाराम नामा भोईर** प्रतिवादी

**१) बाळाराम नामा भोईर,** वय : वर्षे, व्यवसाय : शेती, रा.रुम नं.७०३, निल आस्मा बिल्डींग, सेक्टर २ अ, प्लॉट नं.१५, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड, **२) सत्यवान बाळाराम भोईर,** वय : वर्षे, व्यवसाय : शेती, रा.रुम नं.६०१, शंकर पार्वती सोसायटी, सेक्टर २, प्लॉट नं.४४, करंजाडे, ता.पनवेल., **३) करण बाळाराम भोईर,** वय : वर्षे, व्यवसाय : शेती, रा.रुम नं.७०३, निल आस्मा बिल्डींग, सेक्टर २ अ, प्लॉट नं.१५, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड **४) सोमनाथ बाळाराम भोईर,** वय : वर्षे, व्यवसाय : शेती, रा.रुम नं.४०२, चैतन्य गार्डन, प्लॉट नं.३४, सेक्टर २, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड. १ ते ४ वादी **श्री.मुरलीधर बाळाराम भोईर** यांनी तुमच्या विरुद्ध दावा हक्क प्रस्थापनेकरिता, खरेदीखत दस्त रद्द करण्याकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात दिवाणी दावा हा दाखल केलेला आहे. सदर दाव्याकामी मे.कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हास बेलिफामार्फत दाव्याकामी हजर राहण्यासाठी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना सदर दाव्यातील तुमच्या पत्यावर दोन वेळास समन्स व नोटीसची पाठविण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत हे माहित नाही असे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसत आहे.

तरी तुम्हास कळविण्यात येत आहे की, तुम्हास सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर दाव्याविरुद्ध तुम्हाला तुमचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याकरिता दिनांक रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. सदर दाव्याकामी हजर होवून दाव्याची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास तुमच्या विरुद्ध पुढील आदेश होवून मिळणेकरिता वादीतर्फे मे.कोर्टात अर्ज करून तुमच्या विरुद्ध पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आज दि.८/४/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

सदरहू समन्सची बजावणी दि.प्र.से.५ नियम २० प्रमाणे करण्यात यावी.

| सही/- | कोर्टाचा शिक्का | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.क.स्तर, पनवेल | | दि.न्या.क.स्तर, पनवेल |

मा.गोडसे सो
**वकील : सुनिता राम पाटील आणि**
**दर्शना सोमनाथ पाटील**

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज क्र.२४९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०४/२०२२

**१) श्रीमती.रचना रविशंकर सावंत**
**२) श्री.चिन्मण रविशंकर सावंत**
**३) कु.दुर्वा रविशंकर सावंत**
रा.फ्लॅट नं.बी-३०३, प्लॉट नं.९७, ९९, १०८,
सेक्टर ०९, राधा पॅलेस, पनवेल-४१०२०६ अर्जदार

मयत **कै.रविशंकर गोपाल सावंत** यांचे **१५ नोव्हेंबर २०२० रोजी, जी-७०१, हावरे स्पेंल्डर, टाटा हॉस्पिटल** येथे मृत्यू झालेले आहेत. अर्जदार १) **श्रीमती.रचना रविशंकर सावंत** ही मयत यांची पत्नी आहे. अर्जदार २) **चिन्मण रविशंकर सावंत** हा मयत यांचा मुलगा आहे. अर्जदार ३) **कु.दुर्वा रविशंकर सावंत** ही मयत यांची मुलगी आहे. अर्जदार हे भारतीय रहिवासी, रा.फ्लॅट नं.बी-३०३, प्लॉट नं.९७, ९८, ९९, १०८, सेक्टर-०९, राधा पॅलेस, पनवेल-४१०२०६. तसेच मयत यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**मिळकतीचे वर्णन**

**Flat No.303/B, admeasuring about 254.4 Sq. ft. Built up Area (23.6 Sq.Meters) Plus 156 Sq.Ft., (14.5 Sq.Meters) Terrace Equivalent to 316 Sq.Ft. Built up Area (29.4 Sq.Meters) built up area & Seleable Area is 390 Sq. Ft., "Radha Palace" Situated on the Plot No.97, 98, 99 & 108, Sector-09, New Panvel (E), Navi Mumbai, Total agreement value as per agreement for sale is Rs.3,31,000/- (Rupees Three Lakhs Thirty One Thousand Only) Approximately.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतींच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

दि.०५/०४ माहे, २०२२

| सही/- | कोर्टाचा शिक्का | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.क.स्तर, पनवेल | | दि.न्या.क.स्तर, पनवेल |

मा.गोडसे सो
**ॲड.उज्वला अमित दंडवते**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.२४५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०४/२०२२

**१) श्रीमती.विजया शांताराम लाड**
रा.पी एल, ६ ए, ०१/०२, सेक्टर-१४,
सह्याद्री सी एच एस, न्यू पनवेल वेस्ट-४१०२०६
**२) श्रीमती.शालिनी प्रकाश भोसले**
रा.शाम निवास, रुम नं.३, तळमजला, गोखले रोड,
आईस फॅक्टरी, नियर स्टेट बँक, ठाणे
पो.ओ.नौपाडा, महाराष्ट्र-४००६०२
**३) श्रीमती.प्रिया भगवान पाटील**
रा.सदनिका ७०२, बालाजी आंगण, भूखंड क्रमांक
३११, ३६६ ते ३७०, ओरियन मॉलच्या मागे, पनवेल-४१०२०६
**४) श्री.नितीन शांताराम लाड**
रा.पी एल, ६ ए, ०१/०२, सेक्टर-१४,
सह्याद्री सी एच एस, न्यू पनवेल वेस्ट-४१०२०६
**५) श्रीमती.ज्योत्स्ना शांताराम लाड**
रा.पी एल, ६ ए, ०१/०२, सेक्टर-१४,
सह्याद्री सी एच एस, न्यू पनवेल वेस्ट-४१०२०६
**६) श्री.संतोष शांताराम लाड**
रा.सदनिका क्र-एफ-५, शांताबन हौसिंग कॉम्प्लेक्स,
बेमार्ड कॅमेरिओवाडी, मोरोम्बी-ओ-पिक्युनो सांताक्रुझ,
तिसवाडी, नॉर्थ गोवा-४००३०५ अर्जदार

अर्जदार क्र.१ **श्रीमती.विजया शांताराम लाड** यांचे पती व अर्जदार क्र.२ **श्रीमती.शालिनी प्रकाश भोसले** आणि अर्जदार क्र.३ **श्रीमती.प्रिया भगवान पाटील,** अर्जदार क्र.४ **श्री.नितीन शांताराम लाड** अर्जदार क्र.५ **श्रीमती. ज्योत्स्ना शांताराम लाड,** अर्जदार क्र.६ **श्री.संतोष शांताराम लाड** यांचे वडील **श्री.शांताराम शंकर लाड** हे दि.१३/०८/२०२०, रा.पी एल, ६ ए, १/२, सेक्टर-१४, खांदा कॉलनी, पनवेल, नवी मुंबई-४१०२०६ येथे मयत झाले असून त्यांच्या मालकीची मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे परिशिष्ट**

**Apartment No.14/PL-6A/1/2, SAHYADRI APARTMENT OWNER'S ASSOCIATION, admeasuring About 54.03 Sq.Mtrs. on the Ground floor, of Building No.PL-6A on Plot No.14/1 in sector-14 of Gat No.108, 109, 114, 115/1, 2 New Panvel (West)-410206**

मिळकतीची एकूण किंमत :- रु.२,७१,०००/-

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केला आहे. तरी वरील मिळकतीबाबत जर कोणाची काही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध अगर तक्रारी असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या न्यायालयात करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत वा तक्रार न आल्यास व अर्जदाराचे हक्क शाबित झाल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.२८/०३/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिले.

| सही/- | कोर्टाचा शिक्का | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.व.स्तर, पनवेल | | दि.न्या.व.स्तर, पनवेल |

# संक्षिप्त...

## अंजुमन हायस्कूल म्हसळा येथे इफ्तार पार्टीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नुकताच मुस्लिम समाजाचा पवित्र असा रमजान महिना सुरु झाला. पहाटे पासून सायंकाळी सात वाजेपर्यंत पूर्णपणे उपवास (रोजा ) बाळगून सायंकाळी रोजा सोडला जातो. दरम्यानच्या कालावधीत पाण्याचा थेंबही घेतला जात नाही. सायंकाळी सात वाजता कुटुंबीय, मित्र मंडळींसह पाण्यासोबत प्रथम खजूर खाऊन रोजा सोडला जातो. अंजुमन इ इस्लाम हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा चे प्राचार्य तांबे यांनी हिंदू बांधवाना रोजा सोडणेसाठी हिंदू बांधवांसमवेत रोजा सोडण्याचा नियोजन करून सर्व धर्म समभावाची आठवण द्विगुणित केली. या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी मंगेश साळी, प्राचार्य तांबे, केंद्र प्रमुख अनिल ठाकूर, बांगी सर, मतीन फणसे, नितिन माळीपरगे, नंदाफ सर, संजय गोरेगावकर, राहुल नाईक आदि मान्यवर उपस्थित होते.

## पंधरा वर्षीय तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन जवळ शिवाजीनगर झोपडपट्टी येथील १५ वर्षीय तरुणी मेडिकलमध्ये बँडेज आणण्यासाठी जाते असे सांगून निघून गेली होती. ती घरी परत आली नाही त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. विद्या विशाल साळुंखे असे या मुलीचे नाव असून अंगाने सडपातळ व रंग गव्हाळ आहे. तीची उंची पाच फूट असून चेहरा उभट, डोळे काळे आहेत. तिने अंगात निळा रंगाची जीन्स पॅन्ट व निळा रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट घातलेला आहे. तिला मराठी, हिंदी व राजपूत भाषा बोलता येते. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक दीपक शेळके यांच्याशी संपर्क साधावा.

## २३ वर्षीय तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देविचापाडा, तळोजा येथून २३ वर्षीय तरुणी घरातून निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे .

शांती शिव कुमार भारती हिने घरी फोन करून सांगितले की, माझा शोध घेऊ नका असे सांगून तिने फोन बंद केला. व ती घरातून निघून गेली ती घरी परत आलेली नाही. तिची उंची पाच फूट, दोन इंच, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा उभट, केस काळे व मध्यम आहेत. तिने अंगात काळ्या रंगाचा पंजाबी सूट, लेगीज व पांढऱ्या रंगाची ओढणी घातली आहे. तिला हिंदी, भोजपुरी भाषा बोलता येते. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक अर्जुन पवार यांच्याशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्स्फूर्त



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन, बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस असोसिएशन रायगड, इंडियन बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस फेडरेशन आणि भारतीय जनता पार्टी विचुंबे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ५९ व्या महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विचुंबे गाव येथे झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आशियाई बॉडीबिल्डींग चे सेक्रेटरी डॉ.संजय मोरे, नगरसेवक हरेश केणी, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेवक तेजस कांडपिळे, विकास घरत, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, कामगारनेते रवींद्र नाईक, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिवेश भगत, माजी सरपंच गणपत म्हात्रे, प्रमोद भगत, आलूराम केणी, विवेक भोईर,पोलीस पाटील प्रमोद नाईक, आयोजक व विचुंबे ग्रामपंचायत उपसरपंच प्रमोद भिंगारकर, असोसिएशनचे आयोजक सचिव दिनेश शेळके, रायगड कार्याध्यक्ष मारुती आडकर, ग्रा.पं.सदस्य रवींद्र भोईर, किशोर सुरते, नितीन भोईर, बळीराम पाटील मा.सरपंच विचुंबे, आकाश पाटील सरपंच विचुंबे, अनिल भोईर, जगदीश भोईर, शाम पाटील, सतीश म्हात्रे, नयन भोईर, डी.के.भोईर, अर्जुन सुरते, अविनाश गायकवाड, चेतन सुरते, चेतन भिंगारकर, के. सी. पाटील, अविनाश गायकवाड, सुनील पाटील, अनंता गायकवाड, यांच्यासह बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

गेल्या दोन वर्षात कोविडमुळे सर्व जगाला हादरा बसला. अनेक संकटे जगासमोर उभी राहिली पण आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक एक धोरणात्मक पाऊल उचलून देशाला सावरले. मदत करणे हि आपल्या देशाची संस्कृती आहे, त्यामुळे व्यक्ती, संघटना म्हणून भाजपच्या कार्यकर्त्यांनी मदतीचा हात गरीब गरजूंना दिला. कोरोना काळात व्यायामशाळा आणि शरीरसौष्ठव क्षेत्रावर निर्बंध आले आणि व्यायामशाळांवर आलेली बंदी शेवटी उठली. या काळात व्यायामशाळा आणि संबंधित व्यवसायावर मोठे संकट येऊन या क्षेत्राला मोठा फटका बसला. पण तो सहन करत पुन्हा सक्षम होण्याचे काम शरीरोसौष्ठव पटूंनी केले आहे त्यामुळे त्यांच्या जिद्दीला सलाम करतो आणि पुढे उत्तरोत्तर प्रगती करत रहा अशा शुभेच्छा व्यक्त करतो.

**- आमदार प्रशांत ठाकूर**

# पालीत मोकाट गुरांचा सुळसुळाट



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायत हद्दीतील देऊळवाडी, बाजारपेठ, आणि हटाळेश्वर चौक या विभागात मोकाट गुरांचा वावर वाढल्याने नागरिक हैराण झाले आहे. मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी पालीकरांनी केली आहे. रात्रीच्या वेळेस गुरे रस्त्याच्या मधोमध बसत असल्याने अपघात झाले आहेत व होत आहेत. या मोकाट गुरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी पाली ग्रामस्थ करत आहेत

गणपती मंदीर, हटाळेश्वर चौक, मुख्य बाज-ारपेठ, महाकाली मंदिर परिसर आणि पालीसह संपुर्ण सुधागड तालुक्यात रस्त्यावर दिवसरात्र मोकाट गुरे ठाण मांडून असतात. जनावरांचे मालक, नगरपंचायत व प्रशासनाचे याकडे लक्ष नसल्याचे दिसुन येत आहे. पाली परिसरातील रस्त्यांवर जनावरांची संख्या वाढली आहे. जनावरे भाकड झाल्यानंतर त्यांना रस्त्यावर सोडून देण्यात येते. अशीच ही सोडलेली जनावरे रस्त्यात कळपाने असल्याचे पहायला मिळत आहेत. या गुरांच्या झुंजी होताना दिसतात. मोकाट गुरांच्या वावरामुळे गल्लीबोळीत, रस्त्यावर शेणच शेण पसरल्याचे चित्र आहे.

नगरपंचायत प्रशासनाने मोकाट गुरांना कोंडवाड्याचा रस्ता दाखवून ग्रामस्थांना त्रास-ातून मुक्त करावे व गुरांच्या मालकांविरोधातही कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. तसेच पालीतील मोकाट गुरांच्या बाबतीत कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी अशी मागणी होत आहे.



**दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील दिघी परिसरात हरवित गावच्या खाडी किनाऱ्याला अवाढव्य व्हेल मासा शुक्रवारी दुपारच्या सुमारास मृत अवस्थेत आढळला. या महाकाय माशाचे वजन एक टन पेक्षा जास्त तर लांबी २० ते २५ फूट असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येतोय. या माशाबाबत नागरिकांमध्ये प्रचंड कुतूहल दिसून येतंय. त्यामुळे हा महाकाय मासा पाहण्यासाठी समुद्रकिना-यावर नागरिकांनी गर्दी केलीय. किनाऱ्यावर वाहत आलेला मासा दुपारच्या वेळेत पाण्याला ओहोटी असल्यामुळे या माशाला काढण्यास अडथळा येत असल्याचे श्रीवर्धन वनविभागाकडून सांगण्यात येत आहे.**

# पोलादपूर शहरात उन्हाचा पारा ४१ अंशावर ; मात्र, उन्हाच्या झळा लागताहेत ४४ अंशाच्या

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरात उन्हाचा पारा ४१ अंशावर गेला असून ४४ अंशाच्या उन्हाच्या झळा लागत असल्याचा अनुभव सर्वांना येत आहे.

पोलादपूर शहरामध्ये आनंदनगरमध्ये ३, शिवाजीनगरमध्ये १, सह्याद्रीनगरमध्ये १ तसेच महामार्गालगत २ असे ७ मोबाईल टॉवर्स आहेत. आंतरराष्ट्रीय संशोधनानुसार प्रत्येक मोबाईल टॉवरमुळे साधारणपणे २ अंश सेल्सियस तापमानवाढ होऊ शकत असल्याने मोबाईल टॉवर उभारले जाण्यापूर्वी दरवर्षी ३० ते ३५ अंश सेल्सियस तापमानाला रखरखीत उन्हाळा म्हणण्याचा प्रघात असताना यामध्ये कमालीची वाढ होऊन सध्या ४० अंशापुढे तापमान जाऊन बाबा वेंगाच्या महाराष्ट्रामध्ये ५० अंशापर्यंत तापमानवाढ शक्य असल्याच्या भविष्यवाणीनुसार अनुभव पोलादपूरकरांना येत आहे. गुगल ॲक्यूवेदरवरून तापमान ४१ अंश असताना ४४ अंश तापमानासारखा अनुभव असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या भोवतीची गर्द उंच झाडे तोडून सिमेंट काँक्रीटच्या बांधकाम ाचा वापर सुरू असल्याने पोलादपूर शहराच्या तापमानामध्ये गेल्या काही वर्षांच्या तुलनेत प्रचंड वाढ झालेली दिसून येत आहे. उत्तरवाहिनी सावित्री नदीपात्रातील दगडगोट्यांतूनही उष्णतेचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होत असल्याने हवाम ान तप्त राहात असून या दगडगोट्यांमुळे रात्री उशीरापर्यंत तापमान कमी होत नसल्याचे दिसून येत आहे. महावितरणकडून रात्री तसेच दिवस-ादेखील विद्युतपुरवठा गुल केला जात असून याबद्दल कोणताही अभियंता योग्य उत्तर देण्यास उपलब्ध राहात नसल्याने या तापमानवाढीचा त्रास अधिकच सोसावा लागत आहे.

यंदा पोलादपूरकरांना पावसाळ्याप्रमाणे उन्हाळ्याच्याही तीव्र स्वरूपाच्या झळा सोसाव्या लागत असताना पर्यावरणीय बदलांबाबत कोणीही गांभिर्य व्यक्त करीत नसल्याचे दिसून येत आहे.

# मच्छिमारांच्या डिझेल तेलावरील वाढीव दरासंदर्भात लवकरच निर्णय घेणार : ना.हरदीप सिंग पुरी



**दै.रायगड नगरी । तळा**

कोळी महासंघाचे अध्यक्ष आ. रमेशदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील खा. गोपाल शेट्टी महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती सरचिटणीस किरण कोळी भाजपा प्रदेशाध्यक्ष मच्छिमार सेल चेतनदादा पाटील या मच्छिमारांच्या शिष्टमंडळानी देशातील मच्छिमारांना वाढीव दराने पेट्रोलियम पदार्थ मिळत असल्याबाबत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री ना.हरदीप सिंग पुरी यांच्या निर्माण भवन, नवी दिल्ली कार्यालयात दिनांक ०७/०४/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजता बैठक भेट घेतली.

या बैठकीमध्ये उपस्थितीत अधिकारी यांनी गुजरात व महाराष्ट्रात डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कर परत मिळत असल्यामुळे फक्त एक दोन रूपयांचा फरक राहीला आहे. व इतर सागरी राज्यांचा प्रश्न नाही. अशी चुकीची माहीती देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. परंतू आ. रमेशदादा पाटील व किरण कोळी यांनी अक्षेप घेत सांगितले की, मूल्यवर्धित कर परतावा हा राज्यांचा विषय आहे. आम्ही किरकोळ व घाऊक विक्रेत्या यामध्ये प्रति लिटर रू. २५ ते ३० रूपये फरक आहे. तो कमी करणेबाबत आलो आहोत. याबाबत दिनांक २८/०३/२२ रोजी देखील शिष्टमंडळ आले होते. व आपण मच्छिमारांना विशेष दर्जा निर्माण करून सवलत द्यावी अशी विनंती केली. परंतु अधिकाऱ्यांची नकारात्मक भूमिकेमुळे आ. रमेशदादा पाटील आक्रमक होत सन २०१३ मधील सरकारने सवलत दिली ती सवलत आपले सरकार का देऊ शकत नाहीत असे सांगितले व मच्छिमारांमुळे सरकारवर फार मोठा अर्थिक बोजा पडणार नाही असे बजावले. त्यावेळी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री ना. हरदीप सिंग पुरी यांनी केंद्रीय अर्थ मंत्री यांच्या कार्यालयात प्रस्ताव दिला आहे. लवकरच मच्छिमारांना पेट्रोलियम पदार्थावरील वाढीव दराबाबत केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारमन यांच्याशी चर्चा करून लवकरच निर्णय घेतो असे आश्वासन दिले. तत्पूर्वी केंद्रीय मत्यव्यवसाय मंत्री,मा. परषोत्तम रूपाला यांची दिल्लीत निवासस्थानी भेट घेतली. त्यांनी सदर प्रश्न पंतप्रधान यांच्या पर्यंत नेला आहे. उद्या पंतप्रधान यांना भेटणार आहे असे सांगितले त्यामुळे मच्छिमारांच्या डिझेल तेलावरील वाढीव दर कमी होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# जेएनपीएला मागे सारून अदानीच्या मालकीचे खासगी मुद्रा बंदर बनले देशातील पहिल्या क्रमांकाचे बंदर

**दै.रायगड नगरी । उरण**

बंदराची प्रगती व विविध विकासकामांवर केंद्र सरकारच्या विविध योजना राबवुन दरवर्षी हजारो कोटींच्या खर्चाची उधळपट्टी करून देशातील पहिल्या क्रमांकाचे बंदर म्हणून सातत्याने टेंभा मिरवणाऱ्या जेएनपीएला गुजरात राज्यातील अदानी यांच्या मालकीच्या मुद्रा बंदराने मागे टाकत धक्का दिला आहे.२०२१-२२ या आर्थिक वर्षात जोरदार कामगिरी करत देशातील मुद्रा बंदर नंबर पहिल्या क्रमांकाचे बंदर बनले आहे.

जेएनपीटी आणि आता ३२ वर्षांनंतर नव्या नावाने उदयास येऊ पाहात असलेले जवाहरलाल नेहरू पोर्ट थोरिटी ( जेएनपीए ) सातत्याने देशातील पहिल्या क्रमांकाचे बंदर म्हणून गणले गेले आहे.देशभरात सरकारी मालकीची एकुण ११ तर खासगी मालकीची १३ अशी २४ बंदरे कार्यरत आहेत.देशभरातील सर्व बंदरातील आयात निर्यात होणाऱ्या एकूण कंटेनर मालापैकी ५४ टक्के कंटेनरची वाहतूक जेएनपीए व जेएनपीए अंतर्गत असलेल्या इतर खासगी बंदरातुन केली जाते. जेएनपीएच्या या अजोड कामगिरीमुळेच देशातील सर्वात युवा आणि अव्वल क्रमांकाचे बंदर म्हणूनही ओळखले जाते.जागतिक क्रमवारीतही जेएनपीए पहिल्या २६ व्या क्रमांकावर आहे. केंद्रात खाजगीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर मागील ३२ वर्षात जेएनपीटीच्या मालकीच्या पाचही बंदराचे खाजगीकरण झाले आहे.व्यापार, उद्दीम वाढविण्यासाठी आणि जागतिक क्रमवारीत कामगिरीच्या जोरावर पहिल्या दहाच्या आतील स्थानावर पोहोचण्यासाठी जेएनपीएचा मागील अनेक वर्षांपासून आटापिटा सुरू आहे.यासाठी सागरमाला, पंतप्रधान गतीशक्ती,ईझ ऑफ डूईंग बिझनेस आदी केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेत बंदरा अंतर्गत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हजारो कोटींची उधळपट्टी करण्यात येत आहे.मात्र पायाभूत सोयी सुविधांवरील हजारो कोटींच्या उधळपट्टी नंतरही जेएनपीएन बंदरातील व्यापार गुजरात राज्यातील बंदराकडे जाण्यापासून रोखण्यात अपयशच आल्याचे दिसून येत आहे. अत्याधुनिक सोयीसुविधा, तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात जेएनपीए मागील काही वर्षांपासून जेएनपीए अपयशी ठरल्याने जेएनपीए बंदरातील अनेक शिपिंग कंपन्यांची मालवाहू जहाजे गुजरात राज्यातील काही खासगी बंदराकडे वळली आहेत.यामुळे अर्थातच जेएनपीएचा व्यवसायाला मागील काही वर्षांपासून उतरती कळा लागली आहे.

नुकताच देशातील सरकारी ११ आणि खासगी मालकीच्या १५अशा एकूण २६ बंदराच्या कामकाजाचा लेखाजोखा करणारा अहवाल मांडण्यात आला आहे. ऑल इंडियन कंटेनर टर्मिनल्सच्या २०२१- २२ या वर्षांच्या प्राथमिक अहवालात जेएनपीएने या आर्थिक वर्षात ५६ लाख ८० हजार इतक्या कंटेनर मालाची हाताळणी केली आहे.तर याच आर्थिक वर्षात गुजरात राज्यातील अदानी यांच्या मालकीच्या मुद्रा पोर्टने फेब्रुवारी अखेरीसच ५९ लाख ४० हजार ६२३ इतक्या कंटेनर मालाची हाताळणी करुन जेएनप-ीएला मागे टाकले आहे.मार्च अखेरीस तर अदानी यांच्या खासगी मुद्रा पोर्टने भरारी घेत ६५ लाख १५ हजार १९१ इतक्या कंटेनर हाताळणीचा पल्ला गाठून केंद्र सरकारच्या मालकीच्या जेएनपीएलाच जोरदार धक्का दिला आहे. खासगी मुंद्रा बंदराच्या या दमदार कामगिरीमुळे जेएनपीटीच्या देशातील अव्वल स्थानालाच तडा गेला आहेच.त्याशिवाय जागतिक स्तरावरील २६ वे स्थानही डळमळीत झाले असून यामध्येही घसरण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे जेएनपीएच्या अधिकाऱ्यांमध्ये सध्या तरी चिंतेचे वातावरण पसरले आहे.तर केंद्र सरकारच्या बंदराच्या खासगीकरणाच्या धोरणाला हा जबरदस्त फटका असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया जेएनपीए कामगारांकडून उघडपणे व्यक्त केल्या जात आहेत.

कोरोना काळ, चौथ्या बंदराच्या दुसऱ्या फेजच्या कामाला होत चाललेला विलंब आणि इतर काही अडचणींमुळे जेएनपीऐ बंदर पीछाडीवर गेले असले तरी आगामी काळात आपल्या साजेशा कामगिरीच्या जोरावर जेएनपीए अव्वल स्थानी पुन्हा विराजमान होईल अशी भविष्यवाणी जेएनपीटीच्या या बाबतीत प्रतिक्रिया व्यक्त करण्यास उत्सुक नसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# वस्ती स्वच्छता गृहांसाठी लाखो रूपयांची तरतूद ; अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेच कामे कुर्मगतीने

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांच्या माध्यमातून मागील काळात वस्ती स्वच्छता गृहे गावातील अनेक भागात बांधण्यात आली होती परंतु त्यावेळेस सुध्दा ही कामे अत्यंत घाईगडबडीत निकृष्ठ दर्जाची करून ठेकेदाराने चांगलाच मलिदा प्राप्त केला होता. कालांतराने ह्या स्वच्छता गृहांची अल्पावधीतच वाताहत झाली आहे.

मार्च महिन्यात या वस्ती स्वच्छता गृहांसाठी अंदाजे पंधरा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असताना ह्याच कामासाठी जवळपास सत्त्यातर लाख रुपयांची तरतूद सात स्वच्छता गृहांसाठी करण्यात आली आहे. ही रक्कम सुध्दा मोठया प्रमाणात असून याचा लाभ फक्त ठेकेदारांसाठीच करण्यात येत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. तर रेल्वे स्टेशन परिसरात सुध्दा एक वस्ती स्वच्छता गृह असून याठिकाणी पर्यटकांना सोय उपलब्ध होत असते परंतु एक महिना झाला तरीसुद्धा ह्या स्वच्छता गृहाचे काम अद्यापही पूर्ण करण्यात आलेले नाही.

नगरपरिषदेच्या माध्यमातून या कामासाठी एवढया मोठया प्रमाणावर खर्च करीत असताना कामे खूपच कूर्मगतीने सुरू असून नागरिकांसह पर्यटकांना खूपच त्रासदायक ठरत आहे. याकामी नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने लक्ष केंद्रित करून सर्व स्वच्छता गृहांची कामे ही उत्तम प्रकारे पूर्ण करून घ्यावीत. कामात कुठल्याही प्रकारची चालढकल अथवा निकृष्ट दर्जाचे काम करू नये असे या भागातील भाजपचे कार्यक्षम माजी नगरसेवक संदीप नारायण कदम यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयातील संबंधीत अधिकारी वर्गाला सूचित केले आहे.

